महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष पाचवे ■ अंक ४ था ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जुलै २०१५ पाने–१६

## संपादकीय

### पक्ष्यांना आकाशात मुक्त विहार करू द्या !

या अंकात अन्यत्र एक वृत्त दिले आहे. त्यात दिल्ली उच्च न्यायालयाने पक्ष्यांनाही मूलभूत हक्क असून त्यांना पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवता येणार नाही. त्यांना आकाशात मुक्तपणे विहार करू दिला पाहिजे, असे म्हटले आहे.

वन्य प्राण्यांची सहजासहजी होत असलेली हत्या पाहून भारत सरकारने वन्यजीव संरक्षण कायदा केला. अनेक कायदे केले जातात. पण ज्या जनतेचा त्यांच्याशी थेट संबंध येतो त्यांना ते समजावून सांगण्याचे प्रयत्नच होत नाहीत. परिणामी अज्ञानातून त्यांच्याकडे दुर्लक्ष होते. आजही काही नागरिक हौशीपोटी पिंजऱ्यात प्राणी–पक्षी जखडून ठेवतात. त्यात त्यांना आनंद वाटतो. नागरिक पक्षी घेतात म्हणून त्यांच्या विक्रीचा व्यवसाय होतो. उत्तर भारतात अनेक शहरात पक्ष्यांची खुलेआम विक्री होते. त्यांच्याविरुद्ध वनखात्याकडून, पोलीस खात्याकडून कोणतीही प्रभावी कार्यवाही होत नाही. पुष्कळदा तर या खात्यांच्या आशीर्वादानेच हे धंदे चालतात की काय, अशी शंका येते.

कायदेही फार विचित्र केले जातात. परदेशीय (Exotic) पक्षी पाळण्यास आडकाठी नाही. जागतिक पातळीवर पक्षीजीवन निर्धास्त व्हायचे असल्यास अशी परवानगी देण्याला काही अर्थ नाही. जपानी क्वेल या पक्ष्याला भारतात मुक्तद्वार असल्याने महामार्गावरील अनेक धाब्यांतून क्वेलचे मांस खायला मिळते. जपानी क्वेलच्या नावाखाली देशी क्वेलही टेबलावर जात असावेत, असा संशय व्यक्त केला जातो. कायदापालनाऐवजी त्यातून पळवाट अशी काढावी यात भारतीय माणूस तर तरबेज आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने वन्यजीवसंरक्षण कायद्याचा फेरविचार करावा. त्यात योग्य त्या दुरुस्त्या करून कायद्यातील तरतुदी लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करावा. सरकारच्या मनात असेल तर लोकशिक्षणाकरिता दूरदर्शन व वृत्तपत्रातून किती जाहिरात केली जाते, हे आपण बघतोच.

**– दिगंबर गाडगीळ**

३९, आनंदवन कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, E-mail : dgadgil09@gmail.com

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

---

## अध्यक्षीय

दि. १७ मे २०१५ रोजी एक दिवसीय चौथे कोकण पक्षीमित्र संमेलन संपन्न झाले. १९९९ साली तिसरे संमेलन झाले होते. पंधरा वर्षांनंतर पुन्हा एकदा हे संमेलन साजरे झाले ही आनंदाची बाब आहे. या संमेलनात युवा वर्गाचा उत्साह खूप मोठा होता, ही एक चांगली गोष्ट. आगामी वर्षात करावयाच्या ३/४ गोष्टी ठरविण्यात आल्या. ११० सदस्य संमेलनाला हजर होते. ८ नवीन सभासद झाले. विदर्भातही विभागीय संमेलने नियमित होतात. इतर विभागातसुद्धा अशी संमेलने प्रतिवर्षी झाल्यास पक्षीमित्र चळवळ तळागाळात पोहोचण्यास वेळ लागणार नाही. इतर सर्व विभागांनी आपल्या भागात संमेलने व्हावीत यासाठी प्रयत्न करूया.

जिल्हावार निमंत्रित सदस्य म्हणून काम करण्यासाठी इच्छुक सभासदांनी कृपया कळवावे.

**– भाऊ काटदरे**

९३७३६१०८१७

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# कोकण गिधाड संवर्धन प्रकल्प

सह्याद्री निसर्गमित्र व सी.ई.पी.एफ. यांच्या संयुक्त विद्यमाने वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली कोकणातील रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात गिधाडांचे संवर्धन – संरक्षण, जनजागृतीसाठी आणि गुरांच्या वापरासाठी डायक्लोफेनॅकवरील बंदीची प्रभावी अंमलबजावणी प्रकल्प राबविण्यात येत आहे.

**तक्ता क्र.१ – गिधाड वसाहती**

| गिधाड प्रजाती | जिल्हा – गाव (घरटी) |
|---|---|
| पांढऱ्या पाठीची | रायगड – श्रीवर्धन (३९), चिरगाव (१७) |
| लांब चोचीची | रायगड – नाणेमाची (४), रानवडी (३), पाटणूस (१०), रत्नागिरी – विहाळी (९) |

माणगावपासून दक्षिणेकडील कोकण परिसरात केलेल्या सर्वेक्षणानुसार रायगड–रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमाभागात गिधाडांच्या वसाहती आढळल्या तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात गिधाडांची एकही वसाहत आढळली नाही. ह्या भागात एकूण ६० घरटीच आढळून आली. पांढऱ्या पाठीच्या गिधाडांची श्रीवर्धनमधील सर्व घरटी नारळाच्या झाडांवर आढळली तर चिरगावमध्ये एक घरटे पुनईवर तर इतर सर्व आंब्याच्या झाडांवर आढळली. लांब चोचीच्या गिधाडांची घरटी पश्चिम घाटातील उंच कड्यांवर आढळली. गिधाडांच्या अतिशय आम्लयुक्त विष्ठेमुळे नारळाला कमी उत्पन्न मिळते व मालकाचे नुकसान होते म्हणून अनेक वेळा ही घरटी पाडली जात. सह्याद्रीच्या प्रयत्नाने गिधाडाचे घरटे असलेल्या प्रत्येक नारळाच्या झाडासाठी ₹ ४००/– ही नुकसान भरपाई नारळ मालकाला राज्य सरकारतर्फे घोषित करण्यात आली आहे. सद्यःस्थिती लक्षात घेता ही नुकसान भरपाई ₹ १,०००/– इतकी करावी म्हणून सह्याद्री निसर्गमित्र वन विभाग तसेच राज्य जैवविविधता मंडळाकडे प्रयत्न करीत आहे.

**तक्ता क्र.२ – गिधाडे खाद्य मिळवताना आढळलेली गावे**

| जिल्हा | गाव |
|---|---|
| रायगड | चिरगाव, नाणेमाची, पाटणूस |
| रत्नागिरी | सुकोंडी, कांगवई, बोरखत, देव्हारे, कळकवणे |

ह्या सर्वेक्षणाच्या बरोबरीनेच सह्याद्रीने रफर्ड ह्या संस्थेच्या मदतीतून तीनही जिल्ह्यांतून गुरे उघड्यावर टाकण्याच्या जागांचे सर्वेक्षण हाती घेतले आहे. सह्याद्रीने संपूर्ण कोकण परिसराचे ३० किमी त्रिज्येचे दहा विभाग करून प्रत्येक विभागाचे सर्वेक्षण स्थानिकांतर्फे केले. ह्या भागात कुठे, कधी, किती मेलेली गुरे उघड्यावर टाकली जातात, गिधाडे दिसतात की नाही, उघड्यावरील गुरांची विल्हेवाट लागण्यास साधारण किती दिवस लागतात अशा माहितीचे संकलन केले आहे. त्यानुसार जरी तीनही जिल्ह्यात जवळ जवळ सारख्याच प्रमाणात गुरे उघड्यावर टाकली जात असली तरी गिधाडांच्या वसाहतींजवळ असणाऱ्या अशा गावांमध्येच गिधाडे आपले खाद्य मिळवताना दिसून आले आहे. गिधाडांच्या वसाहतींच्या जवळ असणाऱ्या इतर गावांमधूनही जरी गुरे उघड्यावर टाकली जात असली तरी तिथे गिधाडे का जात नाहीत हा अधिक अभ्यासाचा विषय आहे. उदा. शेखाडी – श्रीवर्धन वसाहतीपासून हवाई अंतर फक्त ३ कि.मी., वडघर – पांगळोली – जवळपास तेवढेच अंतर.

उघड्यावर टाकलेल्या गुरांवर कुत्रे येतात आणि खाद्याच्या उपलब्धतेमुळे त्यांची संख्याही वाढू लागते. कुत्रांच्या वाढत्या संख्येमुळे 'रेबीज' सारख्या भयानक रोगाची शक्यता वाढते. कुत्र्यांनी गावात इतस्ततः टाकलेली मेलेल्या गुराची हाडे फॉस्फरसची कमतरता असलेली गुरे चघळू शकतात. त्यामुळे ती 'बोटुलिझम' नावाच्या रोगाला बळी पडतात. ज्या गावांमधून गुरे उघड्यावर टाकण्याची प्रथा आहे तेथे सह्याद्रीतर्फे स्थानिक पशुवैद्यांच्या मदतीने ही माहिती लोकांना देऊन अशा जागेला कुंपण घालण्यासाठी प्रेरित केले जाते. जिथे गिधाडे खायला येतात अशा गावांची माहिती वन विभागाला देऊन त्यांच्या सहकार्याने जागेला कुंपण घातले गेले आहे. मंडणगड तालुक्यातील गोठे ग्रुप ग्रामपंचायती मार्फत अशा प्रकारच्या जागा गावातर्फेच सांभाळल्या आहेत. तेथे एका वेळेस ५० गिधाडे दिसल्याची नोंदही सह्याद्रीने केली आहे. आजुबाजूच्या गावांतर्फे ही जागा वापरण्यात येत असल्यामुळे नियमितपणे मेलेली गुरे गिधाडांना मिळतात. ह्याच बरोबरीने वन विभागातर्फे दापोली तालुक्यातील सुकोंडी येथे अशाच प्रकारचे गिधाड खाद्य पुरवठा केंद्र चालवले जात आहे.

गिधाडांच्या ह्या सर्व वसाहती मानवी वस्तीपासून अगदी जवळ आहेत. एवढ्या मोठ्या परिसरात फक्त सहा गावांमध्येच असलेल्या गिधाडांच्या वसाहती लक्षात घेता संवर्धनाच्या कामाचे गांभीर्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचून लोकांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. ह्यानुसार सह्याद्रीने कामांची आखणी केली. एवढ्या मोठ्या परिसरात फक्त सहा गावांमध्येच असलेल्या गिधाडांच्या वसाहती लक्षात घेता ह्या कामामध्ये वन विभाग, पशुसंवर्धन विभागाच्या बरोबरीनेच ग्राम पंचायत, स्थानिक, औषध विक्रेते, पर्यटक ह्या सर्वांना समाविष्ट करून सह्याद्री काम करत आहे. सहभागींचे गट – उपगट निश्चित करून, सहभागींचा आणि प्रकल्पाचा एकमेकांबद्दलचा दृष्टिकोन तपासले गेले. सहभागींच्या प्रकल्पातील स्वारस्यानुसार प्रकल्पातील कामांची आखणी करून प्रकल्पाविषयी माहिती देण्याचे माध्यम ठरवले गेले.

प्रत्यक्ष संरक्षण संवर्धनात जनसहभाग वाढविण्यासाठी सह्याद्रीतर्फे विविध कार्यक्रम घेतले जातात. सप्टेंबर महिन्यातील पहिला शनिवार 'जागतिक गिधाड जनजागृती दिवस' म्हणून साजरा केला जातो. ह्या दिवसानिमित्त सह्याद्रीतर्फेही विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. गिधाडांचे महत्त्व परत एकदा लोकांसमोर ठेवण्यासाठी वन विभाग आणि

पान ३ वर...

पान २ वरून...

| सहभागी | प्रकल्पाचे काम | माध्यम |
|---|---|---|
| शेत मजूर आणि इतर मजूर | घरट्यांची नियमित पहाणी, संरक्षण अनियमित बाबींची माहिती देणे | कार्यशाळा, नियमित संपर्क, कार्यक्रमातून सहभाग |
| बागायतदार आणि त्यांची संघटना | घरट्यांची नियमित पहाणी, संरक्षण | कार्यशाळा, नियमित संपर्क, नुकसान भरपाई, कार्यक्रमातून प्रसिद्धी |
| औषध विक्रेते आणि संघटना | नियमांची काटेकोर अंमलबजावणी | कार्यशाळा, माहिती पत्रके |
| वन विभाग | धोरण अंमलबजावणी / बदल | कार्यशाळा, माहिती पत्रके |
| पशू संवर्धन विभाग | डायक्लोफेनॅक बंदीची लोकांना माहिती | पशू तपासणी शिबीर, कार्यशाळा, माहितीपत्रके |
| प्रसारमाध्यमे | जनजागृती | नियमित माहिती, कार्यशाळा |
| पर्यटन व्यावसायिक | अधिक उत्पन्नाचा नवीन मार्ग | कार्यशाळा, माहिती पत्रके, प्रदर्शन |
| पर्यटक | वेगळा पर्यटन अनुभव | निसर्ग महोत्सव, माहिती पत्रके, कामात सहभाग |
| शिक्षण संस्था | नवीन उपक्रम | निसर्गफेरी, प्रभात फेरी, कार्यशाळा, माहिती पत्रके, विविध स्पर्धा |

स्थानिकांच्या मदतीने सह्याद्रीतर्फे गेली दोन वर्षे श्रीवर्धन येथे 'जटायू महोत्सव' साजरा केला जात आहे. ह्या वर्षीच्या कार्यक्रमात स्थानिक वरिष्ठ नागरिक संघ, महिला मंडळ सहभागी झाले. शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीच्या माध्यमातून स्थानिकांना गिधाड संवर्धनाची आठवण करून दिली.

पर्यटकांनी गिधाडाची ८ फुटी पंख पसरून घेतलेली भरारी कॅमेऱ्यात टिपावी, संवर्धनाच्या कामात सहभागी व्हावे म्हणून सह्याद्री प्रयत्न करीत आहे. पर्यटकांची घरगुती राहण्याची सोय करण्यासाठी सह्याद्री स्थानिकांना प्रवृत्त करीत आहे, जेणेकरून गिधाडे पहायला येणाऱ्या लोकांमुळे त्यांना अधिक उत्पन्न मिळू शकेल. पर्यटकांना आकर्षण म्हणून स्थानिकांना फुलपाखरू उद्यान सुरू करण्यासाठीही सह्याद्री स्थानिकांना प्रोत्साहित करत आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर 'SAVE' म्हणजेच (Saving Asian Vultures from Extinction) ह्या संस्थेतर्फे ठरवलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार संपूर्ण कोकण 'गिधाड संरक्षित प्रदेश' व्हावा म्हणजेच गिधाडांच्या वसाहतीपासून १०० किमी त्रिज्येचा प्रदेश 'डायक्लोफेनॅक मुक्त' होण्यासाठी सह्याद्री वन विभाग आणि पशु संवर्धन विभागाच्या मदतीने प्रयत्न करीत आहे.

आपणही गिधाडांची, त्यांच्या नवीन घरट्यांची किंवा उघड्यावरील मेलेली गुरे खायला गिधाडे आल्यास माहिती देऊन, तसेच जंगल किंवा किल्ले भटकंतीत गिधाडांविषयी गावातून माहिती घेऊन प्रकल्पामध्ये सहभागी होऊ शकता. चौथ्या कोकण पक्षीमित्र संमेलनात ठरविल्याप्रमाणे ऑक्टोबर २०१५ नंतर होणाऱ्या 'गिधाड गणने'ची माहितीही 'पक्षीमित्र' मध्ये देण्यात येईल.

**– रामाशिष जोशी**

सह्याद्री निसर्ग मित्र, चिपळूण. फोन – ०२३५५–२५३०३०, ९३२४३९९३४७

e-mail: sahyadricpn@gmail.com, संकेतस्थळ: www.snmcpn.org

## स्वागत नव्या सभासदांचे

**१९ जानेवारी २०१५ ते १७ मे २०१५**

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ७८८ | डॉ. महेश शि. माणगावे | कोल्हापूर | ९८६०८६७२२९ | - |
| ७८९ | श्री. युवराज बा. पाटील | कोल्हापूर | ९२७३०६४५०० | birdwatcher.patil@gmail.com |
| ७९० | श्री. दामू शं. धादवड | ठाणे | ९२२५२१८६९३ | - |
| ७९१ | श्री. अजित श. बर्जे | नाशिक | ०२५३–२४६१९००/९४२०८९१७१८ | ajitbarje@gmail.com |
| ७९२ | श्री. कमलेश अ. माळवदे | सिंधुदुर्ग | ०२३६५–२५५०५/ ९४२२०१९०८७ | malavekamlesh@gmail.com |
| ७९३ | श्री. महेश दि. वाईरकर | सिंधुदुर्ग | ९४२१२६२९९३ | maheshwairkar@gmail.com |
| ७९४ | श्री. अनिल गो. साळवी | पुणे | ९७६४१२५५८८ | aanil.salvi@gmail.com |
| ७९५ | श्री. राजू (आनंद) सी. पाटील | मुंबई | ९८२१९१२२१६/१८ | rajuanandpatil@yahoo.com |

# पक्ष्यांच्या घरट्यांचे वास्तुशास्त्र


अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला...

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देखरे मानसा...

बहिणाबाईंनी ह्या ओव्या लिहिल्या तेव्हा सुगरण पक्ष्याची लोंबकळणारी घरटी जगातील सर्वात गुंतागुंतीची व क्लिष्ट वास्तुशास्त्राचा नमुना आहेत याची कदाचित त्यांना जाणीव नसेल! त्यांनी त्या घरट्याचे आणि सुगरण पक्ष्याच्या सौंदर्यावर भाळूनच ही कविता लिहिली असावी, असे वाटते. तेही मनुष्याने सुगरणीच्या कलागुणांमधून काहीतरी शिकावे म्हणून ती लिहिली असावी, असेही वाटते.

वास्तुशास्त्र किंवा वास्तुकला हे शब्द केवळ मनुष्याच्या राहण्याच्या ठिकाणाबद्दलच नव्हे तर इतरांसाठीही वापरले जातात. पण अशा किती जीवांच्या घराला वास्तुशास्त्र हा शब्द वापरता येईल? मनुष्याव्यतिरिक्त सर्वप्रथम आठवतात ती पक्ष्यांची विविध आकाराची, विविध प्रकारची घरटी अर्थात छोटे सस्तन प्राणी, मुंग्या, वाळवी इत्यादी जीवसुद्धा वास्तुशास्त्रात पारंगत असतात. पण वैविध्याचा विचार केला तर पक्ष्यांनाच जास्त गुण द्यावे लागतील.

बहुतेक पक्षी हे केवळ विणीच्या हंगामात घरटी बांधतात, हे खरे असले तरी अनेक पक्षी वर्षभर रात्रीच्या थाऱ्यासाठी त्याचा उपयोग करतात.


धनेश

पक्ष्यांची वास्तुकला अगदी साध्या घरट्यापासून – म्हणजे जमिनीवर केलेला साधा खळगा – ते खूप क्लिष्ट अशा सुगरण पक्ष्याच्या घरट्यापर्यंत आणि त्याही पलीकडे जाऊन अंतर्गत सजावटी (इंटेरिअर डेकोरेशन) पर्यंत मजल मारणाऱ्या बॉवरबर्डच्या घरट्यापर्यंत अशी विभागता येईल.


**जमिनीवरील साधी घरटी**

जमिनीवर पायाने किंवा चोचीने माती उकरून केलेला छोटा खळगा म्हणजेच हे घरटे. जमिनीवर घरटे करणारे पक्षी वास्तुकलेत अगदीच कच्चे असतात. पण त्यांची अंडी आणि पिल्लं काळपट, मातकट, तपकिरी ठिपक्यांची असतात. अंड्याभोवती छोटे खडे, दगड, माती, चिखलाचे गोळे अशा वस्तू जमवून अंड्यांना रंगछल दिला जातो. अशा उघड्यावरच्या घरट्यांना शत्रूसुद्धा खूप असतात. त्यावर उपाय म्हणून हे पक्षी संकटाची चाहूल लागताच घरटे सोडून दूर जातात आणि कोलाहल करून प्रसंगी जखमी झाल्याचे सोंग करून शत्रूचे लक्ष्य घरट्यापासून विचलित करून स्वतःकडे वेधून घेतात.

अशाप्रकारे आरडाओरड करून शत्रूला मूर्ख बनविण्यात पटाईत असलेले पक्षी म्हणजे टिटवी (लॅपविंग), शेकाट्या (स्टिल्ट), सुरय (टर्न) होत. इतर अनेक पक्षी कोलाहल न करता दबकत दबकत घरट्यापासून दूर निघून जातात. उदा. पाणलावा अथवा कोकस (स्नाईप) आणि धाविक (कोर्सर) पक्षी. आणखी एक मजेदार गोष्ट म्हणजे पालकांनी धोक्याचा इशारा दिल्यानंतर ह्या पक्ष्यांची पिल्लं निपचित पडून राहतात. त्यांच्या आजूबाजूच्या वस्तूंशी मिळत्या जुळत्या रंगसंगतीमुळे पिल्लं अगदीच अदृश्य होऊन जातात.

**बिळातील घरटी**

अनेक प्रजातींचे पक्षी झाडाच्या ढोलीत किंवा जमिनीमध्ये बीळ खोदून त्यात घरटी करतात. आपल्या परिचयाचा सुतार पक्षी (वुडपेकर) त्याच्या मजबूत चोचीने झाडाला पोखरून ढोली तयार करतो. तांबट (बार्बेट) व तांबट कुळातील इतर पक्षी मात्र झाडाच्या वाळलेल्या अथवा मऊ फांदीत छिद्र पोखरतात. अशा प्रकारे दुसऱ्यांनी पोखरलेल्या आयत्या ढोलीचा तसेच झाडांमधील नैसर्गिक ढोल्यांचा ताबा घेऊन त्यात घरटे करणारे पक्षी म्हणजे पोपट, घुबड (आऊल), पिंगळा (आऊलेट), दयाळ (मॅगपाय रॉबिन), धनेश (हॉर्नबिल), साळुंखी (कॉमन मैना), रामगंगा (टिट) हे होत. हे उपरे पक्षी स्वतःची ढोली पोखरण्यास असमर्थ असतात. पण भांडण करून ढोलीचा ताबा मिळविण्यास मात्र तयार असतात.


वेडा राघू

**राघूंची बिळातील घरटी**

जमिनीमध्ये अथवा नदीकाठी भुसभुशीत मातीची जागा शोधून राघू

पान ५ वर...

पान ४ वरून...

(बी-ईटर) व धीवर प्रजातीचे पक्षी त्यांच्या चोचीने लांब भुयारी बीळ खोदतात. विदर्भातील मोठ्या नद्यांवर निळ्या शेपटीच्या राघूंची (ब्लू-टेल्ड बी-ईटर) सामुहिक वीण वसाहत आढळते. पण छोटा वेडा राघू (ग्रीन बी-ईटर) मात्र मोठ्या वसाहतीत वीण करीत नाही. चोचीने बीळ खोदत जाऊन तसेच मागे-मागे सरकत येऊन पायाने माती बाहेर काढली जाते. बिळाची लांबी एक मीटर पेक्षा जास्त असू शकते. बिळाच्या टोकाला एक रुंद अशी खोली अर्थात अंडकक्ष (एग-चेंबर) तयार केली जाते. घरट्यात प्रत्येक वेळेस ये-जा करणारा राघू पक्षी सायकलच्या हवा भरायच्या पंपाप्रमाणे शुद्ध हवा आत पोहचवतो. साप, घोरपड आदी शत्रूंना अशा वसाहतीवर धाड टाकायला आवडते. अशा शत्रूंना मूर्ख बनविण्यासाठी राघू पक्षी अनेक खोटी बिळं खोदतात. अंडी मात्र एकाच बिळात असतात. अशी वीण-वसाहत नदीकाठी असल्यामुळे राघूंना त्यांचे आवडते खाद्य, अर्थात चतुर (ड्रॅगनफ्लाय), मधमाश्या, टाचण्या (डॅम्सेलफ्लाय), फुलपाखरे, इत्यादी मुबलक उपलब्ध असते. वीण भर उन्हाळ्यात होत असली तरी बाहेरच्या तापमानाचा बिळातील एवढ्या आत असलेल्या अंड्यांवर काहीही परिणाम होत नाही. विणीच्या वेळचे नियोजन अशा प्रकारे केले जाते की अंड्यातून पिल्लंही पावसाळ्याच्या आगमनासोबत जन्माला येतात. त्यामुळे पिल्लांना बाहेरच्या उष्म्याचा त्रास तर होत नाहीच, पण पावसाळ्याच्या आगमनासोबत चतुरांची, फुलपाखरांची अचानक वाढलेली संख्या त्यांच्या पथ्यावरच पडते.

**धनेशाचे झाडाच्या ढोलीतील घरटे**

धनेश (हॉर्नबिल) पक्ष्याचे ढोलीतील घरटे करण्याची तऱ्हा मात्र अजब म्हणावी लागेल. अंडी घालण्यापूर्वी धनेशाची मादी स्वतःला ढोलीत बंदिस्त करून घेते. त्यासाठी स्वतःची विष्ठा आणि चिखल लिंपून ती ढोलीचे तोंड बुजवते. असे करताना केवळ एक पातळशी उभी फट मात्र ठेवली जाते. ह्या पातळ फटीतून नर तिच्या गरजा पुरवितो. भर उन्हाळ्यात मादी बंदिस्त असूनही झाडाचे खोड उष्णता प्रतिरोधक असल्यामुळे मादीला व तिच्या पिल्लांना काहीही त्रास जाणवत नाही. बाहेरच्या उष्ण हवेचा झोत आत येत असल्यास मादी स्वतःची चोच ह्या फटीवर ठेवून ढोली बंद करून घेते. स्वतःची विष्ठा बाहेर फेकण्यासाठी मादी स्वतःच्या पार्श्वभागाचा ढोलीच्या फटीवर नेम धरून विष्ठेची पिचकारी उडविते. पिल्लांना मात्र हे कळतही नाही व साधतही नाही. त्याकरिता धनेश पक्ष्यांनी नामी शक्कल शोधली आहे. नर धनेश आजूबाजूच्या झाडांच्या वाळक्या कुरकुरीत ढलप्या आणून मादीला पुरवितो. ह्या ढलप्या मादी पिल्लांच्या बुडाखाली ढकलते! पिल्लं आपसूकच त्या ढलप्यांवर शी करतात. मादी ह्या ढलप्या दररोज ढोलीतून बाहेर फेकत असते. ह्या ढलप्या कुरकुरीत असल्यामुळे त्यावर भरपूर विष्ठा चिकटते. तसेच, घरट्यामधील ओलावा (आर्द्रता) सुद्धा शोषून घेतात. भौतिकशास्त्रामधील चिकटणे (Adsorption) आणि शोषून घेणे (Absorption) ह्या दोन प्रक्रिया येथे घडतात आणि घरट्यातील आर्द्रता नियंत्रित केली जाते. आणखी मजेदार गोष्ट अशी की ह्या ढलप्या औषधी गुणधर्म असलेल्या झाडांच्याच निवडल्या जातात. त्यामुळे घरट्यात मुंग्या अथवा त्रासदायक जंतूंचा प्रादुर्भाव होत नाही. अर्थात, विष्ठा बाहेर फेकली जाऊन घरट्याची स्वच्छता राखली जाते ते वेगळे सांगण्याची गरज नाही! पिल्लांची बऱ्यापैकी वाढ झाल्यानंतर मादी घरट्याची भिंत फोडून बाहेर पडते! पिल्लं घरट्यातून बाहेर पडतात तेव्हा त्यांना उडण्याचे कौशल्य आपसूकच अवगत असते.

घुबडाच्या अनेक प्रजाती ढोलीचा उपयोग प्रजनन काळातच नव्हे तर वर्षभर करतात. ते निशाचर असल्यामुळे दिवसा झोप काढायला, विश्रांतीसाठी तसेच स्वसंरक्षणासाठी सुद्धा त्यांना ढोलीचा उपयोग होतो.

**ओट्यासारखी घरटी**

ह्या घरटे प्रकारात काड्या, काटक्या, तारा इत्यादी साहित्य जमवून त्याचे बाहेरून अस्ताव्यस्त दिसणारे ढिगासारखे घरटे बांधले जाते. पारवे (पिजन), होले (डव्ह), हरियाल (ग्रीन पिजन) सारख्या पक्ष्यांचे घरटे फारच मूलभूत असते आणि अगदी घाई गडबडीत बांधल्याप्रमाणे असते. त्यातही बगळे (इग्रेट), ढोकरी वा वंचक (हेरॉन), पाणकावळे (कार्मोरंट), ह्यांचे घरटे बऱ्यापैकी मजबूत असते. गरूड (इगल), करकोचे (स्टॉर्क), झोळीवाले (पेलीकन), गिधाडे (व्हल्चर) इ. पक्ष्यांचे घरटे म्हणजे काटक्यांचा मोठा मजबूत ढिगारा असतो. गरूड, करकोचे, झोळीवाले व गिधाडांच्या काही प्रजाती दरवर्षी जुन्याच घरट्यावर आणखी काटक्या घालून त्यात वीण करतात. असे दरवर्षी आकारमान वाढत गेल्यामुळे सुवर्ण गरूडाचे (गोल्डन इगल) घरटे दहा फूट व्यासाचे आणि सहा फूट उंचीचे झाल्याची नोंद आहे!

**पाण्यावरील घरटी**

आपल्या देशात आढळणाऱ्या टिबुकली वा दाबचिक (ग्रीब), चांदी बदक वा वारकरी (कॉमन कूट) आणि कमळपक्षी (जकाना) ह्या प्रकारातील पक्ष्यांची घरटी पाण्यावर अर्थात जलीय अधिवासात आढळतात.

दाबचिक आणि वारकरी पाणवनस्पतींचा ढिगारा जमवून काठापासून दूर पाण्यात घरटे बांधतात. घरटे जरी तरंगते वाटत असले तरी त्याला तलावामधील एखाद्या उंचवट्याचा भक्कम आधार घेतलेला असतो. घरटे बांधताना पाणवनस्पतीच महत्त्वाची असल्यामुळे प्रियाराधन करताना नर मादीला पाणवनस्पतीच भेट म्हणून देतो! तसेच जोडी जमण्यापूर्वी नर दाबचिक पाण्यावर धावून दाखवतात! मोठ्या तुरेवाल्या दाबचिकाचे प्रियाराधन नृत्य खूप सुंदर आणि कलात्मक असते. दाबचिक पक्षी घरट्यापासून दूर जाताना दरवेळी अंडी पाणवनस्पतींनी झाकण्याची काळजी घेतो. मजेदार गोष्ट म्हणजे पिल्ले जन्मताच पाण्यात पोहू शकतात (अर्थात तरंगतात)! पण शक्यतो दाबचिक स्वतःची पिल्ले पाठीवर घेऊन फिरतो!

मासा पकडण्यासाठी पाण्यात बुडी मारायची असेल तर दाबचिक पाठ झटकतात. त्यामुळे पिल्ले पाण्यात पडतात आणि तरंगतात. दाबचिक वर येताच पिल्लांना भरवितात. लागलीच पिल्ले परत चढून पाठकुळी बसतात.

पान ६ वर...

पान ५ वरून...

पिल्ले एव्हढी लहान असतात की ती पालकांच्या पिसांमध्ये अगदी दिसेनाशी होतात. दाबचिक आणि वारकरी पक्ष्यांच्या शरीरात तैल ग्रंथी असल्यामुळे त्यांचे शरीर वा पंख भिजत नाहीत.

**कमळ पक्ष्याचे घरटे**

कमळ पक्ष्याचे (जकाना) वैशिष्ट्य असे की त्यांच्या लांब काटकुळ्या पायांना भली लांब अशी बोटे असतात. त्यामुळे त्यांना पाणवनस्पतींवर अलगद चालता येते. कमळपक्ष्याचे घरटे खऱ्या अर्थाने तरंगणारे असते. अगदी मोजकेच सामान (हिरवी देठे इ.) जमवून किंवा सरळ पाणवनस्पतींच्या तरंगणाऱ्या पानावरच मादी अंडी घालते. विशेषकरून ज्या तलावामध्ये कमळ, शिंगाडा यासारख्या पाणवनस्पती भरपूर आहेत त्या ठिकाणी हे पक्षी वीण करतात. असे मोजक्याच सामानाचे घरटे किंवा पानावरच दिलेली अंडी सुरक्षित नसतात. त्यामुळे बरीच अंडी पाण्यात वाहून जातात.

यावर निसर्गाने नामी शक्कल लढवल्या आहेत! एक म्हणजे अंडी सहजी घरंगळणार नाहीत अशी असतात. दुसरे म्हणजे अंडी जलरोधक (वॉटरप्रुफ) असतात आणि पाण्यावर तरंगतात. तिसरे म्हणजे 'नर' संकटकाळी अंडी चोचीमध्ये अथवा पंखांमध्ये धरून सुरक्षित ठिकाणी घेऊन पळत जातो! हे कार्य 'नर' करण्याचे कारण असे की मादी अंडी घालताच दुसऱ्या जोडीदारासोबत निघून गेलेली असते. दुसऱ्या जोडीदारासोबत जोडी जमवून पुन्हा अंडी घातली आणि ती त्या नराच्या सुपूर्द केली की मादी पुन्हा 'रफुचक्कर होते ती तिसऱ्या नराच्या शोधात! कमळ पक्ष्याची मादी अशाप्रकारे 'अंडी घालण्याची मशीन' असल्याप्रमाणे वागते. ती अनेक नरांसोबत जोडी बनवून भरपूर अंडी घालते. मानवी दृष्टीने 'अनैतिक' अशा वागण्याचे कारण आता तुम्हाला कळलेच असेल. तरंगणारे घरटे आणि बेभरवशाचे जलीय पर्यावरण बहुतेक अंडी हरविण्यास कारणीभूत ठरते. वंश टिकवायचा असेल तर भरपूर अंडी घालणे अत्यावश्यक असते. पण मग वास्तुकलेच्या दृष्टीने बघितले तर कमळ पक्ष्याला काहीच गुण मिळू शकत नाहीत. त्याच्या ह्या कमजोरीची पूर्तता निसर्गाने केली म्हणून कमळ पक्ष्याचा वंश टिकून आहे.

**वाटीसारखी घरटी**

काट्या कुटक्यांचे पण बऱ्यापैकी मजबूत आणि वरील बाजूस वाटीसारखी अंड्यांची जागा असे घरटे बांधणाऱ्या पक्ष्यांमध्ये अगदी छोटा पक्षी चष्मेवाला (ओरीएंटल व्हाईट-आय) ते कावळ्यापर्यंत अनेक पक्षी प्रजातींचा समावेश होतो. दोन फांद्यांच्या बेचकीत बरेचदा असे घरटे असते. या प्रकारात छोटे पक्षी बारीक तंतू, धागे, मुळ्या, कोळीष्टके वापरून एक मजबूत वाटीसारखे घरटे बनवितात. घरट्याला आतमधून छान मऊ अस्तर तयार केले जाते. अस्तरासाठी पक्ष्यांची मऊ पिसे, शाल्मलीची, रूईची उडणारी 'म्हातारी' (सिल्क कॉटन), कापूस, इ. सामान मोठ्या मेहनतीने जमविले जाते. मादी घरट्यात बसून गोलगोल फिरून घरट्यात काही रूतणार नाही, याची अनेकदा खात्री करून घेते!

सुभग (कॉमन आयोरा), स्वर्गीय नर्तक (एशियन पॅराडाइज फ्लायकॅचर), कस्तुर (थ्रश) इत्यादी पक्ष्यांच्या घरट्याला बाहेरूनसुद्धा कोळीष्टके, शैवाल (मॉस), कागदाचे तुकडे लावून सजावट केलेली असते. पण ह्या सजावटीचे कारण घरट्याचे सौंदर्य वाढविणे हे नसून घरटे सहज कुणाच्या नजरेस पडू नये, हे असते.

पाणकोंबडीचे घरटे मुख्यत्वे पाणवनस्पतींचे बनलेले असते आणि गडद हिरव्या अथवा काटेरी झुडूपामध्ये दडवलेले असते. कावळ्याचे घरटे मात्र केवळ मजबुतीचा विचार करून बांधलेले असते. ओल्या काटक्या, मुळ्या, लोखंडी तारा, दोरी इत्यादी साहित्य कावळे मोठ्या मेहनतीने जमवितात. कदाचित कावळे ते सोसाट्याचा वारा आणि जोरदार पावसाच्या दृष्टीने बांधत असतील.

**घुमटाकार व चेंडूसारखी घरटी**

मनोली (मुनिया) व भारद्वाज (ग्रेटर कौकल) पक्ष्याचे घरटे एखाद्या चेंडूप्रमाणे असते. गर्द फांद्यांच्या गचपणात आजूबाजूच्या परिसरातील हिरवा पाला-पाचोळा वापरून, त्याला गोल चेंडूप्रमाणे आकार दिला जातो. ही पाती एकमेकांत गुंतवून घरटे मजबूत केले जाते. घरट्याचे प्रवेशद्वार बाजूस असते व आतमध्ये गोलाकार अशीच खोली असते.

**चिखलाची घरटी**

आपल्या परिसरात आढळणाऱ्या धूसर कडा पाकोळी (डस्की क्रॅग मार्टिन), लालपाठी भिंगरी (रेड-रंप्ड स्वालो) आणि भांडीक वा रेषाळ कंठाची भिंगरी (स्ट्रीक-थ्रोटेड स्वालो) ह्या पक्ष्यांची घरटी मातीची असतात. धूसर कडा पाकोळीचे घरटे पर्वतीय कडांमध्ये एखाद्या बाहेर डोकावणाऱ्या खडकाखाली अथवा शहरामध्ये इमारतीच्या खिडकीत तावदानाखाली असते. तिचे घरटे म्हणजे मातीची अर्धवट बशी भिंतीला चिकटवल्याप्रमाणे असते. वरील बाजूस खोलगट भाग असून त्यात अंडी घातली जातात.

लालपाठी भिंगरीचे घरटे अशाच ठिकाणी अथवा दगडी पुलाखाली असते. भांडीकांची (रेषाळ कंठाची भिंगरी) मात्र मोठी वसाहत असते. नद्यांवरील दगडी पुलाखाली अनेकदा अशी वसाहत असते. भांडीकांचे थवे नदीकाठी चिखलाचे छोटे गोळे चोचीत धरून आणतात आणि पुलाच्या खालच्या बाजूस चिकटवून गोल माठाप्रमाणे एकमेकांना चिकटलेली घरटी बांधतात. घरट्याला नळकांड्याप्रमाणे प्रवेशद्वार बांधले जाते. सगळ्या प्रवेशद्वारांची तोंडे एकमेकांपासून दूर असतात. घरट्याच्या आत अंडी व पिल्लांसाठी लोकर व मऊ पिसांचे अस्तर घातले जाते. एकदा पिल्ले निघून ही घरटी रिकामी झाली की चिमण्या त्यात स्वतःची घरटी करतात असे मला आढळून आले.

दक्षिण अमेरिकेत आढळणाऱ्या ओव्हनबर्डचे घरटे असेच मातीचे बनलेले असते आणि नावाप्रमाणेच ओव्हनच्या आकाराचे असते.

**लोंबकळणारी, शिवलेली, विणकाम केलेली घरटी**

शिंजीर वा सूर्यपक्षी (सनबर्ड), फुलटोच्या (फ्लावरपेकर) आणि सुगरण (विव्हर बर्ड) ह्या पक्ष्यांची घरटी लोंबकळणारी असतात.

पान ७ वर...

पान ६ वरून...

फुलटोच्याचे घरटे बटव्यासारखे असते. शिंजिराचे व फुलटोच्याचे घरटे अगदी छोटे असून मजबुतीसाठी कोळीष्टकांचा बराच वापर केलेला असतो. मुद्दाम ते अनाकर्षक केलेले असते. त्यासाठी त्याला बाहेरून उपलब्ध अळ्यांची विष्ठा, कागदाचे, प्लास्टिकचे तुकडे इत्यादीद्वारा सजविले जाते. कित्येकदा आपल्या परसामध्ये असलेले घरटेसुद्धा आपल्याला दिसत नाही.

सुगरण पक्ष्याचे घरटे विहिरीवर झुकलेल्या फांदीला, काटेरी झाडाच्या झुकलेल्या फांदीला अथवा विद्युत तारांना सुद्धा विणलेले असते. घरटे मध्यभागी फुगीर असून वरील बाजूस ते मजबूत गाठीद्वारा फांदीस बांधलेले असते. ही मजबुती वादळवारा आणि पाऊस झेलू शकेल एव्हढी असते. खालच्या बाजूस नळीसारखे लांब, तकलादू प्रवेशद्वार असते. ह्या प्रवेशद्वाराची मदत घेऊन कुठलाही प्राणी-पक्षी घरट्यात प्रवेश करू शकत नाही. मधल्या फुगीर भागात अंडकक्ष असतो. पण घरटे कितीही हेलकावले तरीही अंडी खाली पडणार नाहीत अशी घरट्याची अंतररचना असते. अंडकक्षाच्या वरील बाजूस चिखलाचे लिंपण केलेले असते. त्यामुळे घरटे कमीत कमी हेलकावते तसेच नेहमी सरळ स्थितीत राहते.

शिंपी (कॉमन टेलरबर्ड), वटवट्या (प्रिनीया) ह्या पक्ष्यांचे घरटे म्हणजे एक किंवा दोन पाने एकत्र शिवून तयार केलेली छोटीशी पिशवी असते. पळस, कर्दळी, केळी, बदाम अशा वनस्पतींच्या मोठ्या पानाचा उपयोग घरट्यासाठी केला जातो. शिवणकाम पानाचा नैसर्गिक उतार बघून केले जाते, जेणेकरून पावसाचे पाणी घरट्यात शिरणार नाही. अर्थात खरी कला आहे ती कोळीष्टके, नारळाच्या दशा (तंतू), धागे इत्यादींचा वापर करून पाने एकत्र शिवण्याची ह्या इवल्याशा घरट्यामध्ये कापूस, शाल्मलीची 'म्हातारी' (सिल्क कॉटन), पक्ष्यांची पिसे वापरून मऊ अस्तर घातलेले असते. अशाप्रकारे केवळ एका पानामध्ये शिंपी व वटवट्या पक्ष्याचा संसार फुलतो!


**उंचवट्यावरची घरटी**

काही पक्षी केवळ कचऱ्याचा ढिगारा जमवून उंचवटा तयार झाला की त्यावर छोटा खोलगट भाग तयार करतात आणि त्यात अंडी घालतात. निकोबार बेटावर आढळणारा निकोबार मेगापोड हा पाणकोंबडीसारखा पक्षी असे ढिगाऱ्यावर घरटे करतो. चांदी बदक वा वारकरी (कॉमन कूट) पक्ष्याचे घरटेसुद्धा असेच असते. पण त्याचा बहुतेक भाग पाण्याखाली व थोडकाच भाग पाण्यावर असतो. पेंग्विन पक्ष्यांच्या काही प्रजाती दगडांचा ढिगारा जमवून त्याच्या उंचवट्यावर अंडी घालतात.

**वसाहती वा सामुहिक वीण**

सुगरण व भांडीक पक्षी सामूहिक वीण वसाहतीमध्ये घरटी करतात. भांडिकांची घरटी जरी एकमेकांना खेटून असली तरी प्रवेशद्वार मात्र वेगवेगळे असते.

रोहित (फ्लेमिंगो), गॅनेट व अल्बट्रॉस ह्या समुद्र पक्ष्यांची हजारो घरटी वसाहतीमध्ये एकत्र असतात. रोहित पक्ष्यांची घरटी म्हणजे उथळ पाण्यात चिखलापासून तयार केलेला उंचवटा. ह्या उंचवट्यावर छोटा खळगा ठेवून त्यात अंडी घातली जातात. उंचवट्याची उंची भरतीचे पाणी अंड्यांपर्यंत पोहोचणार नाही इतपत ठेवली जाते. तसेच दोन घरट्यांमधील अंतर हे टोचणी मारू शकण्याच्या अंतरापेक्षा किंचित जास्त असते.




सुगरणीच्या एका विशिष्ट प्रजातीमध्ये (सोशल विव्हर) जवळपास शंभर घरटी एकाला एक चिटकून बांधली जातात. पण आत मात्र प्रत्येकाचा अंडकक्ष व बाहेर प्रवेशद्वार वेगळे असते.

**अंतर्गत सजावट (इंटेरिअर डेकोरेशन) असणारी घरटी**

ऑस्ट्रेलियामध्ये आढळणाऱ्या बॉवरबर्ड या पक्ष्यांची कलात्मक दृष्टी वाखाणण्याजोगी असते. विणीच्या काळात नर काटक्यांची छान कमान तयार करतो. कमानी समोरचे अंगण साफ करून अंगणात छान सजावट करतो. सजावटीमध्ये जांभळ्या, गुलाबी फुलांचा ढीग, सुंदर शिंपल्यांचा संचय अथवा प्लास्टिकच्या वस्तूंची सजावट केली जाते. काटक्यांच्या कमानीजवळ बसून नर गातो व माद्यांना ही गृहसजावट बघण्यासाठी आमंत्रित करतो. ही सगळी कलाकुसर केवळ मादी भुरळ घालण्यासाठी! एकदा जोडी जमली की नर-मादी दोघे मिळून दुसरे घरटे बांधतात!

**(चित्रे : श्री. अनिल माळी)** **- डॉ. राजू कसंबे**

बी-२०५, त्रिमूर्ती अपार्टमेंट, बोरकर गल्ली, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे ४२१२०१. भ्रमणध्वनी ९००४९२४७३१

## पक्षीमित्रांना आवाहन

आपली पक्षीनिरीक्षणे, पक्षीअभ्यास प्रकल्प, पक्ष्यांचे प्रथम दर्शन, शास्त्रीय पेपर इत्यादी पाठवावे. पक्षीमित्रमध्ये प्रसिद्ध केले जाईल. लिखाण हाती लिहून, टाईप करून ई-मेलने pakshimitra@gmail.com वर अथवा पोस्टाने महाराष्ट्र पक्षीमित्र, ११, युनायटेड पार्क, मार्कंडी, चिपळूण या किंवा संपादकांच्या पत्त्यावर पाठवावे.

# वनखात्याच्या अंदाजपत्रकात कपात

जानेवारी २०१५ च्या अंकातील संपादकीयात 'मोदी सरकार पर्यावरण स्नेही आहे का?' असा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नातच ते तसे नाही हे सूचित होत होते. त्याचा प्रत्यय लगेच आला. २०१५-१६ च्या वन आणि पर्यावरण खात्याच्या खर्चाच्या अंदाजपत्रकात जवळजवळ २५% कपात करून ते १६८१.६० कोटींवर आणले आहे.

व्याघ्र प्रकल्पावरचा खर्च २०१४-१५ साली १६१.०२ कोटी होता तो १३६.४५ कोटींवर आणला आहे. पारिस्थितीकी आणि पर्यावरणाचा खर्च ७५० कोटींवर ठेवलेला आहे.

पर्यावरण सुधारणा होण्यासाठी गेल्या वर्षीपेक्षा जास्त खर्च करण्याऐवजी त्यात २५ टक्क्यांनी कपात म्हणजे ही उलटी वाटचाल आहे.

**सकारात्मक आंदोलन – एक रुपया – पर्यावरणासाठी**

केंद्रीय अर्थसंकल्पातील निसर्ग-पर्यावरणासाठीची अत्यल्प तरतूद आणि केंद्र सरकारची एकूणच पर्यावरणविरोधी धोरणे ह्यांच्या विरोधात पुण्यातील तीन निसर्गप्रेमी संस्थांनी एकत्रितरीत्या नुकतेच 'जागर अर्थसंकल्पाचा : एक रुपया पर्यावरणासाठी' हे सकारात्मक आंदोलन सुरू केले आहे. २१ एप्रिल ते ५ जून २०१५ हा ह्या आंदोलनाचा कालावधी आहे. जीविधा, इकॉलॉजिकल सोसायटी आणि पिंपरी-चिंचवड सिटिझन्स फोरम ह्या संस्थांनी उभ्या केलेल्या ह्या अभिनव आंदोलनात सहभागी होण्यासाठी निसर्गप्रेमी आणि सर्वसामान्य नागरिकांनी 'पंतप्रधान राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी'साठी प्रत्येकी एक रुपयाचा धनादेश पंतप्रधान कार्यालयाला नाव-पत्ता आणि पत्रासह पाठवायचा आहे. (पत्ता : प्रधानमंत्री कार्यालय, रायसीना हिल्स, नई दिल्ली-११०००१.) ह्या पत्रात निसर्ग-पर्यावरणासाठी अधिक भरघोस आर्थिक तरतुदी मंजूर करणे; सुब्रह्मण्यम समितीच्या शिफारसी समूळ फेटाळून ही समिती बरखास्त करणे; केंद्र सरकारने आपला एकूण पर्यावरणविरोधी दृष्टिकोण बदलून निसर्गविषयक कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे; निसर्ग-संवर्धनासाठी ठोस पावले उचलणे आणि त्यासाठी ह्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि स्थानिक लोक ह्यांचा सहभाग वाढविणे, ह्या मागण्या करायच्या आहेत.

'रास्ता रोको' किंवा 'धरणे' आंदोलन करून सामाजिक व्यवस्था विस्कळीत करण्याऐवजी सकारात्मक पद्धतीने आपला विरोध नोंदविणे ह्यावर ह्या आंदोलनाचा भर आहे. औद्योगिक विकास-प्रकल्पांची पर्यावरणिक आघात-पडताळणी न करता त्यांना ऑनलाईन मंजुरी देणे; पर्यावरणिक प्रश्नांबाबत न्यायव्यवस्थेचे अधिकार कमी करणे; किंवा अस्तित्वात असलेले निसर्ग-पर्यावरणविषयक कायदे कठोरपणे राबविण्याऐवजी सुधारणांच्या नावाखाली त्यांची पकड सैल करणे, ह्यांसारख्या केंद्र सरकारच्या निसर्गविरोधी धोरणांबाबत सामान्य नागरिकांना जागरूक करणे आणि केंद्र सरकारपर्यंत नागरिकांचा असंतोष आणि विरोध पोहचविणे हा ह्या आंदोलनाचा उद्देश आहे.

स्वतंत्र भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पात निसर्ग-पर्यावरणासाठी आजवर कधीच घसघशीत तरतूद केली गेलेली नाही. २०१५-१६ ह्या वर्षात तर ती सर्वांत कमी आहे. एकूण अर्थसंकल्पीय रक्कमेच्या केवळ ०.००१% एवढीच रक्कम पर्यावरणासाठी पुरविलेली दिसते. ह्याचा अर्थ देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) ०.०१२% एवढीच रक्कम भारतीय निसर्ग-पर्यावरणाच्या वाट्याला येते. शिवाय वने, वन्यजीव, जलस्रोत ह्यांच्या संरक्षण-संवर्धनासाठी निधी उपलब्ध न करता चुकीच्या आणि दिखाऊ गोष्टींना ह्या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात प्राधान्य दिलेले दिसते.

सध्याचे केंद्रीय धोरण आणि कृती ह्या दोन्ही पातळ्यांवर भारतीय निसर्ग-पर्यावरणाचा विनाशच सूचित होताना दिसतो आहे. सत्ताग्रहणानंतर पहिल्या शंभर दिवसात ह्या सरकारने पर्यावरणिक निकष धाब्यावर बसवून २४० औद्योगिक प्रकल्पांना मान्यता दिली आहे. ह्याच सरकारने भारताचे पाच अत्यंत मूलभूत पर्यावरणविषयक कायदे बदलण्यासाठी सुब्रह्मण्यम समिती नेमून तिच्या शिफारसी सरसकट स्वीकारल्या आहेत. अर्थातच ही यादी फार मोठी आहे.

ह्या आंदोलनाचा कालावधी संपल्यानंतर सहभागी नागरिकांची नावे आणि सह्या असलेले पत्र माननीय राष्ट्रपतींकडे पाठवून 'भारतीय संविधान कलम ११५ नुसार, निसर्ग-पर्यावरणासाठीच्या तरतूदी वाढवून त्या संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवल्या जाऊन मंजूर व्हाव्यात; भारतीय निसर्गाच्या रक्षणासाठीच्या कायद्यांची कडक अंमलबजावणी व्हावी,' अशी विनंती केली जाणार आहे.

हे सकारात्मक आंदोलन पुण्यात सुरू झाले असले, तरी महाराष्ट्रातील इतर शहरे-गावे आणि इतर राज्यांमधील सहयोगी संस्थांमार्फत ते देशभरात पसरविण्याचा सदर संस्थांचा मानस आहे.

ह्या आंदोलनाच्या निमित्ताने enviroindia.org हे संकेतस्थळही तयार करण्यात आले आहे. ह्या संकेतस्थळावर आंदोलनाची पार्श्वभूमी अधिक स्पष्ट करणारी इतर माहिती आणि लेख उपलब्ध आहेत.

(गतिमान संतुलनवरून)

## असममध्ये शंभरहून अधिक गिधाडांचा मृत्यू

देशभरात 'गिधाड बचाव' प्रयत्न होत असताना एकट्या असम राज्यात या वर्षी आतापर्यंत १०० गिधाडांचा मृत्यू झाला आहे विषबाधेने. सिवसागर जिल्ह्यात जानेवारी महिन्यात ५० गिधाडे मेली तर आणखी दोन जिल्ह्यात ५४. ही विषबाधा शेतकरी आणि गुरांच्या मालकांनी घडवून आणली होती. जनावरांना कुत्र्यांनी मारल्यावर ती प्रेते कुत्रे खातील त्यांना ठार करण्यासाठी या प्रेतांवर जंतुनाशके फवारली होती. ती प्रेते गिधाडांनी खाल्ल्यावर त्यांचा मृत्यू झाला होता.

# चिपळूणमध्ये चौथे कोकण विभाग पक्षीमित्र संमेलन संपन्न

चौथे कोकण पक्षीमित्र संमेलन चिपळूण येथे रविवार १७ मे रोजी यशस्वीपणे पार पडले. चिपळूणच्या माधव सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात संपूर्ण कोकण प्रांतातून शंभरहून जास्त निसर्गप्रेमी, पक्षीप्रेमी व अभ्यासकांनी सहभाग घेतला होता. चिपळूण शहरातील नामवंत सर्जन असलेले पक्षीप्रेमी व निसर्ग छायाचित्रण यात रमणारे डॉ. विक्रम घाणेकर या संमेलनाला अध्यक्ष म्हणून तर उद्घाटक म्हणून वनविभागाचे विभागीय वनाधिकारी श्री. अमर साबळे उपस्थित होते. श्री. अमर साबळे साहेबांच्या हस्ते डॉ. सालीम अली यांच्या फोटोला हार घालून या संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यात खाजगी जंगलांचे प्रमाण मोठे असल्यामुळे वन विभागाला निसर्ग संवर्धनाचे काम करण्यात अडचणी येत असल्याचे सांगितले. मात्र आता कासव संरक्षण व गिधाड संरक्षण यात वनविभाग संपूर्ण जबाबदारी घेऊन सहभागी होत राहील, याची खात्री दिली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. विक्रम घाणेकर यांनी पक्ष्यांचा पृथ्वीवर मानवापेक्षा जास्त काळ रहिवास असल्याने त्यांचे जैववैविध्य मानवप्राण्यांपेक्षा जास्त प्रमाणात आहे, याची जाणीव करून दिली. त्यांचे निसर्गरक्षणातील योगदान मानव व इतर सस्तन प्राण्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे परमार्थासाठी नव्हे तर स्वार्थासाठी तरी मानवाने पक्षी रक्षणाचे व निसर्ग संवर्धनाचे काम नेटाने केले पाहिजे व यासाठी सर्वांनी एकत्र येऊन हे काम केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपस्थित असणाऱ्या पक्षीप्रेमी व अभ्यासकांनी पक्षी व निसर्ग संवर्धन, संरक्षण या विषयावरील आपले अनुभव कथन केले. काही पक्षी अभ्यासकांनी या संदर्भातील आपली निरीक्षणे सादर केली. ऋतुजा खरे यांनी शास्त्रीय पद्धतीने पक्षी निरीक्षण का व कसे करावे याबाबतचा स्लाईड शो सादर केला. यावेळी मंडणगड तालुक्यातील श्री. मोहन उपाध्ये यांनी त्यांच्या गावातील चेंजेबल हॉक ईगल या जातीच्या पक्ष्याचे घरटे असलेल्या झाडाच्या व त्यावरील घरट्याच्या संरक्षणाच्या यशस्वी प्रयत्नांची माहिती दिली. दापोलीच्या कु. अथर्व सोमण या जिद्दी युवकाने आपल्या अपंगत्वावर मात करत दापोली परिसरात पक्ष्यांवर तयार केलेली चित्रफित सर्वांची दाद मिळवून गेली. श्री. वैभव राजदीप यांनी पश्चिम घाटातील गिधाड संरक्षण प्रकल्पात काम करताना या कामाचे स्वरूप व त्यात मिळालेले फायदे त्यांनी स्थानिक ग्रामस्थांचे या कामाला सहकार्य मिळविण्यासाठी केलेले रोजगार निर्मितीचे प्रयत्न याची माहिती दिली. रत्नागिरीचे श्री. श्रीकांत ढालकर यांनी पक्ष्यांचे आवाज काढून उपस्थितांची दाद मिळवली. डॉ. श्रीधर जोशी यांनी चिपळूण परिसरात पक्ष्यांचे केलेले चित्रीकरण दाखवले. फुलातील मकरंद खाणाऱ्या पक्ष्यांचे चित्रीकरण यात होते. कु. सोहम घोरपडे या विद्यार्थ्याने सह्याद्री निसर्ग मित्रच्या सहवासात आल्यामुळे योग्य प्रकारे पक्षीनिरीक्षण करण्यास कशी सुरुवात झाली याबाबत आपल्या अनुभवाची फिल्म दाखवली.

सकाळच्या सत्रात झालेल्या गिधाड संरक्षणावरील खुल्या चर्चासत्रात वेगवेगळ्या गावातून आलेल्या निसर्गप्रेमींनी त्यांच्या भागात दिसलेल्या गिधाडांबाबत माहिती दिली. विशेषतः लाँग बिल्ड गिधाडांच्या बाबतची माहिती, त्यांची घरटी कडेकपारीत असल्यामुळे, गिर्यारोहणासाठी जाणाऱ्या गिर्यारोहक संस्थांकडून मिळवावी असे ठरले.

दुपारच्या खुल्या चर्चेच्या वेळी पक्षी निरीक्षण व निसर्गसंवर्धनाबाबत चर्चा झाली.या चर्चेत मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामात होण्याची शक्यता असलेली प्रचंड वृक्षतोड या विषयावर चर्चा झाली. या कामाच्या वेळी होणाऱ्या वृक्षतोडीवर नवीन वृक्षलागवड आत्तापासून सुरू करावी, शक्य तेथे वृक्षांची पुनर्लागवड करण्याचा प्रयत्न करावा, अशा तऱ्हेचे पर्याय शासनाकडून योग्य प्रकारे राबवले जावे यासाठी त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात दबाव आणण्याचा प्रयत्न, सह्यांची मोहीम वगैरे प्रकारे करावा असे ठरले.

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष श्री. भाऊ काटदरे यांनी समारोप करताना शासन स्तरावर वनविभाग, निसर्गप्रेमी संघटना हे निसर्गसंवर्धनाचे काम आपापल्यापरीने करीत असतात, त्यांनी परस्पर संपर्काने हे काम पुढे नेले तर जास्त प्रभावीपणे होईल. संशोधनाचे काम करणारे शास्त्रज्ञ तसेच तळागाळात काम करणारे कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ या सर्वांचे काम यात महत्त्वपूर्ण आहे. या संमेलनाच्या वेळी –

१) गिधाडांच्या घरट्यांसाठी दत्तक योजना राबवावी,

२) कोकण परिसरातील पक्षी वेबसाईट तयार करणे,

३) पक्ष्यांचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी ३० मे रोजी पहिली सभा घेणे.

४) गोवा-मुंबई या महामार्गाच्या बांधणीच्या काळात तुटणाऱ्या झाडांबाबत अभ्यासगट तसेच दबावगट स्थापन करून कमीत कमी वृक्षतोड व्हावी,

असे ठराव पास करण्यात आले.

## पक्ष्यांना आकाशात मुक्त विहार करण्याचा हक्क

### - दिल्ली उच्च न्यायालयाचे मत

पक्ष्यांनाही मूलभूत हक्क असून त्यांना पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवता येणार नाही. त्यांना आकाशात मुक्तपणे विहार करू दिला पाहिजे, असे दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले आहे. पक्ष्यांचा व्यापार करणे हा त्यांच्या मूलभूत हक्कांचा भंग आहे असे न्यायालयाचे मत आहे.

न्या.मनमोहन सिंग यांनी पक्ष्यांना पिंजऱ्यात ठेवून त्यांची परदेशात बेकायदा निर्यात केली जात असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. या पक्ष्यांच्या अन्न, पाणी व उपचारांची काळजीही घेतली जात नाही असे त्यांनी म्हटले.

पक्षी मालक महंमद मोहझिम व दिल्ली पोलीस यांना न्यायालयाने नोटीस दिली असून २८ मे पर्यंत उत्तर देण्यास सांगितले आहे. कनिष्ठ न्यायालयाने ज्या व्यक्तीकडून पक्षी जप्त केले त्यांना ते परत देण्याचा जो निकाल दिला होता त्याला दिल्ली उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. पीपल फॉर ॲनिमल्स या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या याचिकेत पक्ष्यांना मालकांच्या ताब्यात देण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयास आव्हान देण्यात आले होते.

दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, पक्ष्यांचा व्यापार करणे हे त्यांच्या मूलभूत हक्कांच्या विरोधात आहे. त्यांना सहानुभूतीची गरज आहे. पक्ष्यांना क्रूरतेने वागवेल जाते. त्यांची काळजी कुणी करीत नाही. पक्ष्यांना मुक्तपणे उडण्याचा हक्क आहे व त्यांना पिंजऱ्यात डांबता येणार नाही, असा कायदा असताना त्यांना आकाशात सोडून दिले पाहिजे. (लोकसत्तावरून)

# उशिरा उठणारे आळशी...

मध्यान्ह उलटून गेल्यावर कपाळावरील घर्मबिंदू टिपण्यात मग्न असताना अचानक आलेल्या मलबारी कर्णाच्या आवाजाने जणू थंडगार कैरीचे पन्हे प्यायल्याचा भास झाला आणि सर्व थकवा एका क्षणात नाहीसा झाला. दुपारची सुमारे दोन वाजताची वेळ... भीमाशंकर अभयारण्यातील एक पायवाट... सूर्य उजाडायच्या आत बाईकला मारलेल्या किक्स आणि अर्ध्या झोपेत असलेला माझा सखा सांगाती सुशांत मोरे...

ठरवलेच होते मनात की आज काहीतरी नवीन बघूनच जायचं. असा ध्यास मनात ठेवून अभयारण्यात कूच केले. तसा किलबिलाट बऱ्याच पक्ष्यांचा येता होता. त्यातल्या सूर्यपक्षी, बुलबुल, फुलटोचा, मोनार्क, स्वर्गीय नर्तक, जंगली कोंबडा या नेहमीच्या पक्ष्यांनी दर्शन दिले. जसजसा सूर्य वर चढत होता तसा या पक्ष्यांचा आवाजही कमी होऊ लागला. सावली शोधत सर्व पक्षी दाट झाडीमध्ये गडप होऊ लागले होते. आम्ही सुद्धा एका सुकलेल्या ओहोळाशेजारी न्याहरी करून घेतली. आता पुढे थोडा डोंगर माथ्याचा भाग असल्यामुळे आता पुढे फक्त काही शिकारी पक्षी आणि कडक उन्हात गवतामध्ये लपलेले लार्कसारखे पक्षी दिसतील या विचाराने थोडा निराश झालो होतो. इतक्यात मलबारी राखी धनेश याच्या कर्कश्य आवाजाने निराशा थोडीशी दूर झाली. म्हटलं बाकी काही नाही तरी हा आपला आजचा हायलाईट ठरेल. असे बोलून आवाजाच्या दिशेने चालायला सुरुवात केली. चालताना ट्री पिपिट आणि काही लार्क यांनी सुशांतला छान पोज देऊन थांबवून घेतले. सूर्य बऱ्यापैकी वर आला होता म्हणून माझी नजर सारखी आकाशात शिकारी पक्ष्यांकडे लागली होती. पण डोंगर माथ्याचा भाग संपला तरी एकसुद्धा शिकारी दिसला नाही. आता पुढचा भाग पुन्हा दाट झाडीचा असल्यामुळे मी पुरता नाराज झालो होतो. कारण दुपारच्या वेळी सहसा पक्षी जास्त किलबिलाट न करता आरामात असतात. त्यामुळे त्यांना शोधणं कठीण! त्यामुळे सूर्यकिरण जमिनीवर पोहोचणे कठीण असलेल्या त्या घनदाट पायवाटेने चालताना आम्ही दोघांनी आमचेच फोटो काढायला सुरुवात केली. मग इथे नको, तिथे थोडं पुढे गेल्यावर चांगला फोटो येईल असं म्हणत म्हणत नकळत परतीच्या वाटेला लागलो आणि अचानक टुर्रर... असा आवाज आला. माझा कानावर विश्वास बसत नव्हता म्हणून सुशांतला विचारले, 'काही ऐकलंस का?' तर तो नाही म्हणाला, आणि मी मलाच शिव्या देत म्हटलं, 'तुलाच बरे सर्व आवाज ऐकू येतात दुर्मिळ पक्ष्यांचे... हा आवाज मलबारी कर्णा याचा होता हे माहीत होतं कारण काही दिवसांपूर्वीच दांडेली मध्ये हा पक्षी बघून आलो होतो. पण या पक्ष्याचा अधिवास आणि सवयी यांचा अभ्यास न करण्याचा आळस मीच केला होता. त्यामुळे काहीच अंदाज नव्हता की हा पक्षी या वेळेला इथे पहायला मिळेल. न राहवून सुशातला सांगितलं, 'मी आवाज ऐकलाय. आत्ता आणि तो मलबारी कर्णाच होता.' सुशांतने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'हो, हीच वेळ आहे त्याची उठायची.' हे ऐकून मी चाटच पडलो. दोघे मिळून सशासारखे कान टवकारून ऐकू लागलो. आणि पुन्हा आवाज आला आणि दुसऱ्या क्षणाला हिरव्या गर्द झाडीमधून गुलाबी रंगाचा बाण आल्यासारखा मलबारी कर्णा आमच्या समोरच्या फांदीवर येऊन बसला! आम्ही कसलीही हालचाल न करता स्तब्ध झालो. आणि त्यानं त्याचं गाणं पुन्हा सुरू केलं. सुशांतला डोळ्यानेच खुणावलं आणि छायाचित्रण सुरू केलं. पण लगेच तो उडाला आणि झाडीमध्ये गायब झाला. पण आवाज येतच होता. इतक्यात दुसरीकडून पण तोच आवाज... मग आम्ही दोघांनी आपापसात ठरवून दोन वेगवेगळ्या झाडाच्या बुंध्यांशी जागा निवडून बसून राहिलो. दोघांचे कपडे झाडाच्या बुंध्याच्या रंगाशी साजेसे असल्याने खूप फायदा झाला. एकामागोमाग एक असे तीन आवाज आम्हाला तीन दिशांनी येऊ लागले. आज तर लॉटरी लागली, असं समजून खूप खुश होतो. त्यात तीन नर कर्णा आणि तीन मादी कर्णा असे एकूण सहा जणांनी हजेरी लावून त्या वातावरणात आम्हाला पावसाच्या सरीचा अनुभव दिला होता. एक तास मनसोक्त फोटो काढून आम्ही निघायचं ठरवलं.



जो दुर्मिळ पक्षी बघायला गोवा आण्ड तिथून पुढच्या पश्चिम घाटाच्या जंगलात जावे लागते तो पक्षी आपल्या जवळच्या जंगलात बघायला मिळणं ही आमच्यासाठी पर्वणीच होती. मलबारी कर्णा इतर पक्ष्यांपेक्षा उशिरा आपली दिनचर्या सुरू करतो हे कळलं आणि उशिरा उठणारे आळशी तसेच उशिरा अभ्यास करणारा मी यातलं साम्य शोधत घराची वाट धरली...

**– अविनाश भगत**

# प्रतीक्षा

आम्हाला दोघांनाही झाडांची आवड असल्यामुळे आम्ही आमच्या टेरेसवर कुंती, सोनचाफा, तगर, स्टारॲपल, कडुलिंब, आरेका पाम अशी अनेक झाडे लावली आहेत. बाहेरच्या रस्त्याच्या बाजूला पर्जन्यवृक्ष, सप्तपर्णी आणि गुलमोहरचे वृक्ष आहेत. टेरेसवर दुपारचे दोन ते तीन तास ऊन असते. बाकीच्या टेरेसच्या भागावर शेड आहे. बऱ्याच वेळा आम्ही सकाळचा चहा टेरेसवर बसून आरामात घेत असतो.

गेल्या फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात purple Sunbird ची एक मादी आरेका पामच्या एका अर्धवट सुकलेल्या पानाच्या शिरा कुरतडत होती. तिचा हा उद्योग बराच वेळ चालला होता. ह्या पामची फांदी टेरेसच्या मधल्या मोकळ्या जागेकडे झुकली आहे. जमिनीपासून अंदाजे साडेपाच फुटांवर असेल. तिच्या खालच्या बाजूस काही कुंड्या आहेत व मागील बाजूस शेडमध्ये हँगिंग पॉटस् आहेत.

मध्ये आम्ही एक आठवड्यासाठी बाहेरगावी गेलो होतो. १९ फेब्रुवारीला रात्री परत आलो. २० फेब्रुवारीला सकाळी बागेत पाणी घालायला गेले तर माझ्या डोक्यावरून एक सूर्यपक्षी उडाला व माझे लक्ष त्याच्या घरट्याकडे गेले.

आरेका पामच्या त्या पानाच्या मधल्या जाड शिरेच्या एका काडीवर बटव्याच्या आकाराचे एक गबाळे घरटे लटकत होते. कागदासारखी पातळ साल, पालापाचोळा व कोळिष्टके यांनी ते बनवले होते. घरट्याचे तोंड रस्त्याच्या दिशेने म्हणजेच वृक्षावरून उडत येण्याच्या दिशेने होते. मला त्यांच्या हालचाली स्वयंपाक घराच्या किंवा बेडरूमच्या खिडकीतून निरखता येत होत्या.

नराचा रंग पाठीकडून झळाळणारा किरमिजी, जांभळा हिरवा व दुरून चमकताना काळा दिसत होता. मादीचा रंग पाठीकडे ऑलिव्ह हिरवा, पोटाच्या खालील भाग पिवळा व मागचा भाग पांढरा होता.



सूर्यपक्ष्यांची जोडी येण्याआधी त्यांचा चीविट–विट् असा आवाज येई व नंतर मोठ्या वृक्षांवरून ते टेरेसवरील झाडांवर किंवा पाईपवर उतरत. इकडे तिकडे बघत, आवाज करत, काहीतरी टिपत त्यांचे फिरणे चाले. मग एकटी मादी घरट्यावर उतरे. तिच्या चोचीत पिसे, काडया असे काहीतरी असे. कधी घरट्यावर बसून घरट्यात चोच खुपसे तर कधी घरट्यात बसून सभोवतालचे निरीक्षण करी. नर मात्र फांद्यांवरून फुलांवर झेपावत चिवीट–विट् असा आवाज करे. मला वाटते कधी कधी मादी रात्रीचीही घरट्यात बसत असावी.

आता तर मादी तासन् तास घरट्यात बसू लागली. मधून मधून तिची बाहेर फेरी व्हायची. मधूनच नर तिला भेटायला वाऱ्याच्या वेगाने घरट्यावर उतरायचा व क्षणात परत उडायचा. माझ्याकडे त्याची पाठ असायची. त्याच्या जाण्याने घरटे कितीतरी वेळ हलत असायचे.

दहा मार्चला मला घरट्याच्या खाली एक अंड्याचे छोटेसे अर्धवट कवच मिळाले. ते पांढरे अस्पष्ट डाग असलेले व वजनाला अतिशय हलके होते. दोन दिवसांनी घरट्यात हालचाल सुरू झाली. हळू हळू पिलांची विचित्र केस विरहित डोकी व मानेचा लालसर मांसल भाग दिसू लागला. घरट्याच्या जवळपास गेल्यावर, चिक् चिक् ऐकू येत असे.

आईचा आवाज आला की पिले थरथरत कंप करीत चोची रूंदावून चीची आवाज करत पुढे पुढे येत. मला खिडकीतून त्यांच्या फाकलेल्या चोचींच्या आतील लाल भाग दिसे. मादी त्यांना सारखी भरवे – अगदी पूर्ण चोच त्यांच्या तोंडात घालून. कधी घरट्यावर बसे व तिची पिलांकडे पाठ असे तेव्हा तिच्या लांबसडक चोचीमधून गुलाबी अगदी बारीक लांब सापासारखी जीभ लवलवत असे. थोडा वेळ तसे केल्यावर मग ती बाळांना भरवत असे.

आता पिलांची वाढ झपाट्याने होऊ लागली. त्यांची भूकही वाढत होती. दोन्ही नर–मादी सारखे येऊन त्यांना भरवत होते. त्या दोन्ही बाळांची चित्कारत धडपडत खाऊ मिळवायची धडपड चाले.

दोन दिवसांनी अचानक बिगर मोसमी वादळीवारा सुटला व पाऊस झाला. वाऱ्यामुळे ते घरटे सारखे झोके घेत होते. आम्हाला पिलांची काळजी वाटत होती. पिले अगदी घरट्यात दबून बसली होती. पण नशीबाने घरट्याला किंवा पिलांना काही दुखापत झाली नाही.

हळूहळू पिलांचे शरीर आकार घेऊ लागले. अंगावर मऊ पिसे आली व ती गुबगुबीत देखणी दिसू लागली. आईवडिलांच्या येरझाऱ्या वाढल्या. त्यांची भरवण्यासाठी होणारी घालमेल बघण्यासारखी होती. त्या पिलांमधील एक पिलू सुदृढ व थोडे धटिंगण होते. ते खाऊसाठी दुसऱ्या पिलाला दाबून त्याच्यावर चढे. दुपारपर्यंत ह्या साऱ्या हालचाली वेगात असत. नंतर थोडी शांतता असे. फेऱ्याही कमी होत. मादी घरट्यावर उलटी लटकत तासन् तास आसमंत निरखीत असे. मध्येच घरट्याकडे पहात तिचे निरीक्षण चाले. नर मात्र कधीच थांबत नसे. आम्हीही कावळे मांजरी येणार नाहीत ह्याची काळजी घेत असू. कावळ्याचा आवाज आला की पिले घरट्याच्या आत दबून बसत. सूर्यपक्ष्याच्या चीविट्–विट् ने त्या जोडीच्या आगमनाची सूचना पिलांप्रमाणे मलाही कळे. मी हातातील काम टाकून खिडकीशी पोहोचे. तिथे माझा कॅमेराही तयार असे. त्या खिडकीतून पिले छान दिसत. मी पडद्यामागे लपून त्यांच्या आईचे व त्यांचे बरेच फोटो व व्हिडीओ शूट केले. नराची मात्र एखादीच झलक टिपता आली.

पिले आता आकाराने मोठी व आईसारखी दिसू लागली. एक पिलू तर

पान १२ वर...

पान ११ वरून...

घरट्याच्या इतके बाहेर येई की आता उडेल असे मला वाटे. मलाही त्यांचे उडणे बघायची उत्सुकता होती. २८ मार्चला मी त्यांना शेवटचे पाहिले. २९ मार्चला सकाळी घरटे रिकामे, सारे शांत, सूर्यपक्ष्याचे येणे-जाणे, त्याची चिवीट्-वीट् सारेच थांबले होते. पिलांचे उडणे मात्र मला पाहता आले नव्हते. मी दोन-तीन दिवस सारखी त्यांची वाट पहात होते. मग मात्र माझी खात्री झाली की ती कायमची उडून गेलीत.

१० फेब्रुवारी ते २९ मार्च एवढ्या वेळात जागा शोधणे, घरटे बांधणे ते पिले उडून जाण्यापर्यंतचे सूर्यपक्ष्याचे एक जीवनचक्र पूर्ण झाले, ज्याचे आम्ही साक्षीदार होतो. मी कुठेतरी वाचले होते की घरटे फळले की काहीवेळा सूर्यपक्षी ते घरटे परत वापरतात. पण आठवड्याभरातच घरटे जुनाट व विशविशीत वाटू लागले.

दोन दिवसांपूर्वी मादी अचानक घरट्याकडे येऊन गेली. माझी आशा पल्लवित झाली की ती आता घरट्याची डागडुजी करेल का ? व आम्हाला सूर्यपक्ष्याच्या जीवनचक्राचा आनंददायी थरार पुन्हा अनुभवता येईल का ?

**– समज राजपूत, ठाणे**. फोन – ९९६७५९५२०१

# २८वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

नेचर वॉक, पुणे यांच्या संयोजनाखाली २८ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन पुणे येथील महात्मा फुले संग्रहालयात १७-१८ जानेवारी २०१५ रोजी उत्साहाने साजरे झाले. नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, मुंबई व कोकणातून २३० पक्षी मित्रांनी संमेलनात हजेरी लावली होती.



संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावरील मान्यवर

अध्यक्षस्थानी डॉ. संजीव नलावडे हे होते. (त्यांचे भाषण गेल्या अंकात दिले होते) उद्घाटन मा. श्रीनिवासजी पाटील, राज्यपाल, सिक्कीम यांच्या हस्ते पद्मभूषण डॉ. माधव गाडगीळ यांच्या उपस्थितीत पार पडले. व्यासपीठावर महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष श्री. भाऊ काटदरे, माजी संमेलनाध्यक्ष डॉ. अनिल पिंपळापुरे, नेचरवॉकचे श्री. चंद्रसेन शिरोळे व श्री. सुनील लिमये, प्रधान वनसंरक्षक वन्यप्राणी, उपस्थित होते. याच वेळी श्री. शरद आपटे यांची पक्षीगान सी.डी. आणि श्री. किरण पुरंदरे, डॉ. दिलीप यार्दी आणि डॉ. पिंपळापुरे यांच्या पक्षीविषयक पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

दोन दिवसांच्या संमेलनात एकंदर २२ उपस्थितांनी सादरीकरण केले. विशेष उल्लेखनीय म्हणजे ९ वर्षाच्या एका मुलाने मार्टिन पक्ष्याचे घरटे वाचविण्याकरता केलेल्या प्रयत्नांचा आढावा.

१८ जानेवारीच्या सकाळी सुमारे ८० पक्षीमित्रांनी ARAI टेकडीवर पक्षी निरीक्षणाचा आनंद घेतला.

संमेलनातील अंतिम सत्रात श्री. निलमकुमार खैरे, श्री. श्रीकांत इंगळहळ्ळीकर आणि डॉ. सत्यशील नादूक या तज्ज्ञांबरोबर संवाद घडविण्यात आला.

**– अनुज खरे**

# स्वागत नव्या सभासदांचे

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ७९६ | श्री. अनुज खरे | पुणे | ९३२६८२३०५२ | informanuj@gmail.com |
| ७९७ | श्री. चंद्रकांत जा. सावर्डेकर | चिपळूण | ९४२३२९२३६५ | chandrakant12@gmail.com |
| ७९८ | श्री. अविनाश ना. पळसपगार | सांगली | ८६०५३१७७०८ | avinashpalaspagar296@gmail.com |
| ७९९ | श्री. दिनेश ज. विन्हेरकर | मुंबई | ९३२२२४३२१६/ ९८७०२४३२१६ | dvinherkar20@gmail.com |
| ८०० | श्री. श्रीपाद गो. ओक | नांदेड | ९४२२९२०६६४/९९७०३०१३९६ | shrioke@gmail.com |
| ८०१ | श्री. अश्विन ओ. शेळके | अमरावती | ८९७५८५२६२५ | - |
| ८०२ | श्री. अमोल सु. रावणकार | अकोला | ७७०९५८१०१२ | amol_ravankar@yahoo.co.in |
| ८०३ | श्री. प्रज्वल डी. लोणारे | अमरावती | ९०२८२२७१०१ | prajwal.dl@hotmail.com |
| ८०४ | प्रा. डॉ. चंद्रशेखर रा. कासार | यवतमाळ | ९९६०३१५१७१ | dr_crkasar@rediffmail.com |
| ८०५ | कु. निकिता रा. जनी | अमरावती | ७३०४१९२९६४/९८६०१४९२४१ | nikita10jane@gmail.com |


## टपाल तिकिटांच्या दुनियेत -

# देवहंस (White Winged Wood Duck)

देवहंस (White Winged Wood Duck) हा पक्षी जगातील अत्यंत संकटग्रस्त प्रजातींमधील एक आहे. एकेकाळी हा पक्षी ईशान्य पूर्व भारत व दक्षिण पूर्व आशियामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळून येत असे. परंतु सातत्याने होणारा अधिवासाचा ऱ्हास, शिकार इत्यादी कारणांमुळे जगामध्ये त्यांची संख्या ८०० वर आली आहे. त्यापैकी ४५० च्या संख्येने म्यानमार, बांगलादेश व भारतातील आसाम व अरुणाचल प्रदेशात अस्तित्वात आहेत.

ह्या पक्ष्याचे शरीर काळ्या रंगाचे असते व डोके व मान पांढऱ्या रंगाची असते व त्यावर जाड काळे ठिपके असतात. डोळे लाल किंवा नारिंगी रंगाचे असतात. नर व मादी थोड्या-फार फरकाने सारखेच दिसतात. फक्त नराच्या पंखावर चकाकी असते व आकाराने मोठे असतात.

हा पक्षी अति उष्ण तापमानातील सदाहरित जंगलात वास्तव्य करतो व नदी, ओढे यांच्या दलदलीच्या दुर्गम अशा जागेत रहाणे पसंत करतो. देवहंस हा जोडीने किंवा चार-सहाच्या समूहात दिसून येतो. त्याला सावलीत राहणे आवडते व दिवसाचा वेळ दुर्गम जंगलातील भागात घालवतो.



भारतीय टपाल खात्यातर्फे १८ मे १९८५ रोजी देवहंस या पक्ष्यावर दोन रुपये किंमतीचे टपाल तिकीट प्रकाशित करण्यात आले.

**- रवींद्र वामनाचार्य, नाशिक.**

*मो. ९८९०३९०५२७, e-mail : r_wamanacharya@yahoo.co.in*

## स्वागत नव्या सभासदांचे

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ८०६ | श्री कृष्णकुमार उ. लांजेवार | नागपूर | ०७१०३-२८११७५/८२७५३९८८९३ | krishnalanjewar@gmail.com |
| ८०७ | डॉ. प्रविण पु. जोशी | यवतमाळ | ९८२२५१७१८८ | drpravinpjoshi@gmail.com |
| ८०८ | श्री. कृष्णकुमार नि. गवई | यवतमाळ | ९८२२९३६३०१ | - |
| ८०९ | डॉ. वैभव ग. ठाकरे | अमरावती | ९९६०३५७६८८ | vaibhaothakare@gmail.com |
| ८१० | प्रा. डॉ. शारदा वि. देशमुख | अमरावती | ८०८७७४५९९४ | sharadavd@gmail.com |
| ८११ | डॉ. दीपलक्ष्मी स. कुलकर्णी | अमरावती | ०७२१-२५७४७४६/९५४५२१७८१७ | deeplaxmi26@rediffmail.com |
| ८१२ | श्री. शिशिर म. शेंडोकार | अकोला | ८४८३०३५७६० | shishir.shendokar@gmail.com |
| ८१३ | श्री. अल्केश वि. ठाकरे | अमरावती | ७५८८०८४३३८/९३७३७२४४७८ | alkeshthakare@gmail.com |
| ८१४ | श्री. रोहित व. पाटील | मुंबई | ०२२-२६७३४४७४/९२२४३६२०९२ | patil.rohit21@gmail.com |
| ८१५ | सौ. अपर्णा गि. जोईस | दापोली | ०२३५८-२८२०२४/९२२६३६६१४२ | asp_20072008@rediffmail.com |
| ८१६ | श्रीमती शिल्पा वि. देवरूखकर | गुहागर | ७७३८६२३९९९ | shilpa.deu@gmail.com |
| ८१७ | श्री. आशिष म. निमकर | मुंबई | ७७७४८६३०९९ | ashishmnimkar@gmail.com |
| ८१८ | श्री. सुभाषराव म. पाटील | देवरूख | ९४०५३३९०५६ | subhashpatil64@hotmail.com |
| ८१९ | श्री. नयनीश र. गुढेकर | चिपळूण | ०२३५५-२५६९१२/९४२२४२९९४४ | nayanish_gudhekar@yahoo.co.in |
| ८२० | डॉ. श्री. रत्नाकर सी. थत्ते | चिपळूण | ०२३५५-२५२६५८/९६२३०४४५०८ | - |
| ८२१ | सौ. वृषाली सु. पाठारे | चिपळूण | ९४०४९५३३४९/९९६७४३६०५५ | vrushalipathare@yahoo.com |
| ८२२ | प्रा. श्री. सत्येंद्र वि. राजे | चिपळूण | ९४२२८७८७०५ | sattendraraje@rediffmail.com |

पक्षीमित्र अंकनिधीसाठी कुसुम गोखले यांच्याकडून ₹३००/-

## Indian Bird Conservation Network

The Indian Bird Conservation Network (IBCN) was established in 1998 by the BNHS in collaboration with BirdLife International and the Royal Society for the Protection of Birds (RSPB) - BirdLife partner in the UK. The IBCN is a network of organisations and individuals promoting the conservation of birds and their habitats in India and strengthening the biological diversity of the region.

### Objectives

The IBCN promotes interest and takes action at a local, state and national level. The network monitors and safeguards IBAs through:

❖ Research & Monitoring ❖ Conservation Action
❖ Awareness & Education ❖ Policy & Advocacy
❖ Fund Raising ❖ Site Support Groups

### Present Scenario

The IBCN is one of the leading membership networks in India, with about 100 organisational and 1000 individual members.

### Benefits of IBCN Membership

- ❖ Provides a common platform for conservation of birds.
- ❖ Opportunity to bring conservation issues to the national audience.
- ❖ Opportunity to participate in network activities, surveys, research projects and workshops.
- ❖ A copy of the quarterly newsletter Mistnet to voice your opinion.

### Mistnet

Contains articles and information on bird species (threatened and common), identified Important Bird Areas (IBAs) along with conservation issues, interventions and advocacy for the protection of biodiversity and their habitat.

**Join today**

**For more details contact:**

Indian Bird Conservation Network,
C/o BNHS, Hornbill House,
Opp. Lion Gate, S.B. Singh Road,
Mumbai 400 001, India
Email: ibabnhs@gmail.com, Website : www.ibcn.in
Tel: 022-22818957, 22821811, Fax: 022-22837615

## Form for Individual Membership of the IBCN

(Fill in BLOCK LETTERS)

1. Name ______________________________
(Mr/Mrs/Ms/Dr)

2. Date of Birth : Day ___ Month _________ Year _____

3. Address ______________________________
______________________________
______________________________
______________________________
Dist ____________________ Pin ________
State______________________________

4. Telephone/Mobile No. __________________

5. Email ______________________________

6. Website ______________________________

7. Organization/Position __________________

8. Academic qualifications ________________

9. Important Bird Areas which you visit ______________
______________________________

10. Please list any other bird conservation organization that you are a member of : ________________

11. If proposed by IBCN member/state coordinator please mention Name ________________

Date ____________ Applicant Signature

Annual membership fee is ₹ 150/- for an Indian member and $15 for an overseas member payable through DD/Cheque/M.O./Bank Transfer in favour of **'BOMBAY NATURAL HISTORY SOCIETY'**. Outstation cheques should include additional ₹ 65/- towards bank charges.

**Kindly send the form to -**

Project Manager, IBCN, C/o BNHS, Hornbill House,
Opp. Lion Gate, S.B.Singh Road, Mumbai 400001, India.
**Email :** ibabnhs@gmail.com**, Website :** www.ibcn.in

## Form for Organization Membership of the IBCN

(Fill in BLOCK LETTERS)

1. Name of the organization ______________________

2. Address ______________________

3. Telephone ______________ Fax ____________
4. Email ______________________
5. Date of Establishment ______________________
   Registration No. ______________________
6. Aims & Objectives of the Organization ____________

7. Main Activities of organization, especially in bird conservation

8. Number of Members : ______________________
9. What is the management structure of the organization (e.g. Council, Board of Trustees, Committees) ________

10. Who would be your nominated representative?
    Name ______________________
    Position ______________________
11. Important Bird Areas which you visit ____________
12. If proposed by IBCN member/state coordinator please mention Name ______________________
13. Please enclose the following : (a) Latest Annual Report, (b) Any other relevant information (e.g. Project Report, Information Leaflets, etc.)

Date __________ Applicant Signature

Annual membership fee is ₹ 200/- for an Indian organization and $25 for an overseas organization payable through DD/Cheque/M.O./Bank Transfer in favour of **'BOMBAY NATURAL HISTORY SOCIETY'**. Outstation cheques should include additional ₹ 65/- towards bank charges.

**Kindly send the form to -**

Project Manager, IBCN, C/o BNHS, Hornbill House,
Opp. Lion Gate, S.B.Singh Road, Mumbai 400001, India.

**Email :** ibabnhs@gmail.com**, Website :** www.ibcn.in

# स्वतःच घ्यावा पुढाकार

विकासाच्या हव्यासापोटी मानवाने स्वतःपलीकडे इतरांची पर्वा केली नाही. त्यातून पशू व पक्ष्यांसाठी निर्माण केलेल्या अडचणी सोडविण्यासाठी आता मानवानेच पुढाकार घेतला पाहिजे.

शाहुपुरीतील अशोक आफळे (महाराष्ट्र पक्षीमित्रचे सभासद) हे पक्ष्यांसाठी नियमित खाद्यपदार्थ ठेवतातच, शिवाय पाण्यामध्ये साखर अथवा ग्लुकोज टाकून उन्हाळ्याच्या दिवसात पक्ष्यांचा उत्साह वाढवत आहेत. त्यांचा हा उपक्रम सर्वांसाठी अनुकरणीय आहे.

उन्हाळ्याच्या तडाख्याने पक्ष्यांची चांगलीच ससेहोलपट होत असते. गारवा निर्माण करणारे जुने वाडे व झाडे जाऊन काँक्रिटच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत. यामुळे पक्ष्यांचे उन्हाळ्याच्या दिवसातील विसावे नष्ट झाले आहेत. साहजिकच अन्न व पाण्यासाठीही त्यांची दमछाक होत आहे. त्यांच्या अडचणी या मानवनिर्मित आहेत. त्यामुळे त्या सोडविण्यासाठी मानवानेच पुढाकार घेतला पाहिजे हे तत्त्व बाळगून आफळे यांनी सर्वांना आदर्श असा उपक्रम आपल्या घराच्या परिसरात राबवला आहे.

घराची गच्ची असो वा समोरील अंगण असो, तिथे पक्ष्यांना पिता येईल अशा भांड्यामध्ये ते पाणी ठेवतात. बेकरीतील ब्रेड, बिस्किटासारखे पॅकिंगमधील जे पदार्थ असतात त्यांच्या पॅकिंगमध्ये भुगा पडतो. तो आपण सहजपणे कचऱ्याच्या डब्यात टाकतो. तोही पक्ष्यांचे चांगले अन्न होते.

याशिवाय दररोज घरात गहू किंवा ज्वारीचे पीठ चाळले जाते. चाळल्यानंतर त्या पिठातील जो भाग राहतो, त्याला चाळ म्हणतात. तो भाग पक्षी आवडीने खातात असा आफळे यांचा अनुभव आहे. तसेच जेवण झाल्यानंतर जे खरकटे रहाते ते कचऱ्यात टाकून न देता पाण्याशेजारी उथळ भांड्यात ठेवावे. पक्षी तेही खूप आवडीने खातात व घरातील कचराही निघून जातो.

घराबाहेरील उष्णतेने पाणीही गरम होते. अनेकवेळा ते पाणी पक्षी पीत नाहीत. त्यासाठी पाणी सावलीत ठेवल्यास त्याचा पक्ष्यांना खरोखर उपयोग होईल. लहानग्या पक्ष्यांसाठी असे लहानगे प्रयत्नही जीव वाचविण्याचे फार मोठे काम होऊ शकते हे आफळे यांनी दाखवून दिले आहे.

(म. टा. कोल्हापूर)

## निरोप

‘पुढच्या वर्षी लवकर या’
असं म्हणत
पाखरांना निरोप देताना
झाड आतून गहिवरलं,
तेव्हा पाखरांच्याही
डोळ्यांत पाणी आलं.
पुन्हा परतायला पंख
जागेवर असतीलच,
याची पाखरांना खात्री नव्हती
आणि
पाखरं परततील
तेव्हा स्वागत करायला
आपण उभे असूच
याची झाडाला शाश्वती नव्हती.

**–डॉ.उमेश करंबेळकर, सातारा**
(राजहंस ग्रंथवेध वरून)

# Financial support from IBCN

IBCN
Brings people for birds

BNHS
INDIA CONSERVING NATURE SINCE 1883

rspb giving nature a home

BirdLife
INTERNATIONAL

Please join Indian Bird Conservation Network (IBCN).
For details see website: www.ibcn.in

Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

**Book Packet containing periodicals**

प्रति,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी – ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

**पक्षीमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेल, नाशिक
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस – चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०